किंमत फक्त १ रुपया

# पुण्य नगरी

कोल्हापूर • वर्ष : ८ • अंक : ८३ • शनिवार, २७ मार्च २०१० • पाने १२+४ = १६, किंमत १.०० रुपया

## एमबीएची पूर्वतयारी विषयावर व्याख्यान

कोल्हापूर, दि. २६ (प्रतिनिधी) - कमला महाविद्यालयाच्या कॉमर्स फोरममार्फत विद्यार्थिनींसाठी एमबीएची पूर्वतयारी या विषयावर अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या एमबीए विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. अनिल सूर्यवंशी यांचे व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी बोलताना ते म्हणाले.



*कमला कॉलेजमध्ये एमबीएची पूर्वतयारी याविषयी मार्गदर्शन करतेवेळी प्रा. डॉ. अनिल सूर्यवंशी. सोबत प्राध्यापक वर्ग. (छाया : कृष्णात निगडे)*

स्पर्धात्मक परीक्षा आणि व्यावसायिक अभ्यासक्रम करताना द्याव्या लागणाऱ्या परीक्षांची सांगड कशी घालावी व त्यातून कशा पद्धतीने यश मिळविता येईल त्याचबरोबर गट चर्चा आणि वैयक्तिक मुलाखत आणि इंग्रजी संभाषणाची तसेच कलागुणांची आवश्यकता यावर भर दिल्यास चांगले गुण प्राप्त करता येतात आणि हव्या त्या इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश सहज घेता येतो.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी कमला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांचे मार्गदर्शन घेण्यात आले. व्याख्यानाचे आयोजन व प्रास्ताविक वाणिज्य विभागप्रमुख प्रा. एस.व्ही. बागल यांनी केले. प्रा. डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी आभार मानले. या व्याख्यानासाठी प्रा. ए.एम. साळोखे यांचे सहकार्य मिळाले.